M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परीक्षा प्राधान्य
अत्यंत महत्वाचे

क्र.मुंविमं./माध्य.प्रात्य. / ३०४/ २३८०
नवी मुंबई- ४००७०३
दि.०९/०६/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक,

विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा मध्ये विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग)विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा शालेय स्तरावर आयोजित करण्याबाबत...

संदर्भ:- १. क्र.रा.मं. / परीक्षा-६/१७६५/पुणे-४११००४, दि. २२/०५/०२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांच्या कार्यशिक्षण विषयांतर्गत होणा-या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा राज्य मंडळाच्या वरील संदर्भिय क्र.१ च्या पत्रान्वये मंगळवार दि. २४ जुन २०२५ ते शुक्रवार दि. ०४ जुलै २०२५ या कालावधीत शालेय स्तरावर परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे त्याच दिवशी व त्याच वेळेत घेण्यात यावी, तसेच कोणताही विद्यार्थी परीक्षेपासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील. आपल्या काही अडचणी/त्रुटी असल्यास मंडळास लेखी स्वरुपात कळविण्यात यावे. कार्यशिक्षण विषयाच्या परीक्षेसाठी आपल्या शाळेतील कार्यशिक्षण विषय शिक्षकाची नियुक्ती करण्यात यावी आपल्या शाळेतील नोटीस बोर्डावर कार्यशक्षण विषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक लावण्यात यावे. परीक्षेच्या वेळी वार्षिक कामाची वही (JOURNAL) आणण्याबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. कार्यशिक्षण विषयांच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी व मराठी माध्यमातूनच संपादित केल्या जातात. जर आपल्या शाळेत/संस्थेत इंग्रजी व मराठी माध्यमांव्यतिरिक्त इतर माध्यमातून विद्यार्थी प्रविष्ठ होत असतील तर संबंधित शाळेतील / संस्थेतील शिक्षकांकडून त्या-त्या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे परीक्षेच्या एक तास अगोदर संबंधित माध्यमातून भाषांतर करून त्या विद्यार्थ्यांना द्याव्यात. सदरहू भाषांतरीत प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना वाटप होईपर्यंत गोपनीयतेची योग्य ती काळजी घेण्यात यावी. आपणास वितरीत करण्यात आलेल्या प्रश्नसंचावर कोणतेही वर्ष नमूद केले असले तरी आपण सदर प्रश्नसंचावर जुन-जुलै २०२५ अशी दुरुस्ती करून नंतरच हे प्रश्नसंच वापरण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत दुरूस्तीविना प्रश्नसंचाचा वापर होणार नाही याची दक्षता मुख्याध्यापकांनी घ्यावी.

विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांतर्गत होणारी लेखी / प्रात्यक्षिक परीक्षेच्या प्रश्नपत्रिका, गुणपत्रिका, उत्तरपत्रिका व इतर साहीत्याचे **वाटप शुक्रवार दि.२०/०६/२०२५ रोजी ११.०० ते दुपारी ५.०० या वेळेत मंडळ कार्यालयात करण्यात येईल.** आपल्या शाळेतील जबाबदार प्रतिनिधीस अधिकारपत्र देवून साहित्य ताब्यात घेण्याची व्यवस्था करण्यात यावी. पत्रामध्ये विषय व माध्यमनिहाय एकूण विद्यार्थी संख्या व बैठक क्रमांक नमूद करावे. गोपनीय साहित्य दिलेल्या तारखेस घेऊन जाण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील याची नोंद घ्यावी.

विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांच्या कार्यशिक्षण विषयाच्या लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिका न तपासता, मंडळाने निर्धारित केलेल्या दिनांकास कार्यालयात सादर करण्यात याव्यात. लेखी परीक्षेचे गुण उत्तरपत्रिकांची तपासणी व नियमन मंडळात करावयाचे असल्यामुळे नमूद करण्यात येऊ नयेत. गुणपत्रिका गुणपत्रिकेच्या पाकिटामध्ये घालणे व हजेरी तक्त्यात (Attandance Report) मध्ये विद्यार्थी उपस्थित असल्याची स्वाक्षरी, विद्यार्थी गैरहजर असल्यास लाल शाईने

Absent नमूद करून पाकीट सिलबंद करून देणे. कार्यशिक्षण विषयाचे वार्षिक काम मंडळास जमा करण्यात येऊ नये. ते आपल्या शाळेमध्ये सहा महिने जतन करून ठेवण्यात यावे.

कार्यशिक्षण विषयाचे लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रक (इ.१०वी) जुन-जुलै २०२५ पुरवणी परीक्षा

अ.क्र.	सांकेतांक क्र.	विषयाचे नाव	वार	दिनांक	सत्र
१	जे १	घरगुती विद्युत उपकरणे	मंगळवार	२४/०६/२०२५	दुपार
२.	जे ५	दुध आणि दुधाचे पदार्थ	बुधवार	२५/०६/२०२५	दुपार
३.	जे ९	हस्तभरतकाम	शुक्रवार	२७/०६/२०२५	दुपार
४.	के १	शिवण यंत्राव्दारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरुस्ती	शनिवार	२८/०६/२०२५	दुपार
५	के ५	टाकाऊ वस्तुपासुन सौंदर्याकृती	सोमवार	३०/०६/२०२५	दुपार
६	एल ७	पाककला	मंगळवार	०१/०७/२०२५	दुपार
७	एम ३	भारतीय संगीत (वादन-गायन)	बुधवार	०२/०७/२०२५	दुपार
८	एम ६	चित्रकला व रंगकाम	गुरूवार	०३/७/२०२५	दुपार
९	एम ७	कागदकाम, पुठ्ठाकाम व पुस्तकबांधणी	शुक्रवार	०४/०७/२०२५	दुपार

मंडळामध्ये जमा करण्याच्या साहित्याची यादी खालील प्रमाणे.

१. लेखी परीक्षा उत्तरपत्रिका सिलबंद पाकीट (न तपासता) २. प्रात्यक्षिक काम(**Practical Job**) ३. गुणपत्रिका सिलबंद पाकीट व हजेरी तक्ता.

गुणपत्रिका व उत्तरपत्रिका मंडळ कार्यालयात जमा करण्याची तारीख खालीलप्रमाणे आहेत

अ.क्र.	कार्यशिक्षण विषय कोड क्रमांक	उत्तरपत्रिका व गुणपत्रिका मंडळात जमा करण्याचा दिनांक
१.	सर्व विषय	सोमवार दि.०७/०७/२०२५

(ज्योत्स्ना शिंदे - पवार)
विभागीय सचिव (प्र)
मुंबई विभागीय मंडळ
वाशी, नवी मुबई ४००७०३